महाराष्ट्र शासन
# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in
४१२-ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**परिपत्रक :-**

जा. क्र. : तंशिविकापु/विवि-३/मान्यता/२०२३/१३४८
दिनांक : २४/०३/२०२३

**प्रति,**

प्राचार्य / संचालक,
या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त सर्व पदविका,पदवी व पदव्युत्तर पदवी व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्था (पुणे विभाग)

**विषय : अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद,नवी दिल्ली यांचे जाहिर सुचेनेस अनुसरुन शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून विद्यमान संस्थांनी अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने निर्देशित केलेल्या पोर्टलवर ऑन लाईन अर्ज केलेल्या तथा करण्यात येणाऱ्या अर्जाबाबत..**

**संदर्भ** :- १. अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद नवी दिल्ली यांनी त्यांचे संकेतस्थळावर प्रसिध्द केलेली जाहिरात क्रमांक RegulationBureau/AICTE/03(02)/२०२३ दि.२१.०३.२०२३
२. संचालनालयाचे पत्र क्र.०२/एनजीपी/अआयसीटीई-मान्यता/२०२३-२४/२६९ दि.२४.०३.२०२३

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली (AICTE) यांनी संदर्भीय जाहिर सुचनेव्दारे ॲप्रुव्हल प्रोसेस हँडबुक २०२३-२४, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद (टेक्निकल इन्स्टिटयुशनकरिता मान्यतेला मंजूरी) विनियम २०२० आणि पहिली दुरुस्ती विनियम, २०२१ यामधील तरतूदीनुसार विद्यमान संस्थाचे मान्यता प्रक्रियेचे विविध अर्ज अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने निर्देशित केलेल्या पोर्टलवर दि.२३.०३.२०२३ पासुन दि.०६.४.२०२३ पर्यंत तसेच विलंब शुल्कासह ऑन लाईन अर्ज सादर करण्याचा शेवटचा दि. १३.०४.२०२३ हा निर्धारित केलेला आहे. अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी संदर्भीय जाहिर सुचनेत नमूद केलेल्या अर्जापैकी खालील अर्जासाठी राज्य शासनाचे ना-हरकत प्रमाणपत्र आवश्यक आहे.

१. संस्था बंद करुन तेथे नवीन व्यावसायिक अभ्यासक्रमाची संस्था सुरु करणे. (Institution applied for Closure of the Institution for starting of a new Technical Institution in the same premises in the same year)
२. पदविका पातळीच्या संस्थेचे पदवी पातळीच्या संस्थेत रुपांतरण आणि त्याउलट करणे. (Conversion of Diploma Level into Degree Level and Vice-versa)
३. विद्यमान संस्थेत नवीन विद्याशाखा (Programme) /स्तर (Level) सुरु करणे. (To start New Programme/ Level in the existing Institutions
४. साईट/लोकेशन मध्ये बदल करणे (Change of Site /Location)
५. महिला संस्थेचे को-एज्यकेशन मध्ये परिवर्तन व त्याउलट (Conversion of Women's Institution into Co-ed Institution and Vice-versa)
६. संस्था बंद करणे (Closure of the Institution)
७. ट्रस्ट/सोसायटी/कंपीनच्या नावात/पत्यात बदल करणे (Change in the Name/ Address of the Trust/Society/Company)

अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या संदर्भीय जाहिर सुचनेस अनुसरुन या विभागातील अभियांत्रिकी, हॉटेल मॅनेजमेंट अँड कॅटरींग टेक्नॉलॉजी, व्यवस्थापनशास्त्र (एमबीए,पीजीडीबीएम), एमसीए, डिझाईन, प्लॅनिंग या अभ्यासक्रमांच्या पदविका, पदवी, पदव्युत्तर पदवी व पदविकोत्तर पदविका स्तरावरील विद्यमान संस्थांनी वरील अर्ज अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने निर्देशित केलेल्या पोर्टलवर केले असतील किंवा करणार असतील अशा संस्थांच्या अर्जाबाबत शासनाचे ना-हकरत प्रमाणपत्र देण्याकरीता प्रत्यक्ष तपासणी करण्यात येणार आहे. संबंधित विद्यमान संस्थांनी वरील अर्ज सादर केल्यानंतर प्रत्यक्ष तपासणीसह सर्व औपचारीक कार्यवाही होऊन प्रत्यक्ष शासनाने ना-हरकत प्रमाणपत्र निर्गमित करण्यासाठी पुरेसा अवधी अपेक्षीत आहे.

क्र.मा.प.

संबंधित संस्थांनी दि.२२.०२.२०१८ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेले नोंदणी शुल्क डीडी व्दारे सहसंचालक,तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, पुणे (Joint Director, Technical Education,Regional Office pune )या नावे या कार्यालयाकडे जमा करावे.

तसेच **दि.१२.०४.२०२३ पर्यंत वरील अर्ज या कार्यालयाकडे जमा करावा.** या अर्जासोबत अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या संकेतस्थळावरील https://www.aicte-india.org/sites/dedault/files/approval/2023-24/Appendix-17.pdf या लिंक वर नमूद केलेले सर्व कागदपत्रे जोडणे अनिवार्य आहे.संबंधित संस्थांनी दि.१२.०४.२०२३ पर्यंत या कार्यालयास अर्ज सादर न केल्यास व परिणामी शासनाचे अभिप्राय, शासन मान्यता इ.बाबत आगामी काळात काही अडचणी निर्माण झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित संस्थांची राहील याची नोंद घेण्यात यावी.

(डॉ.द.व्यं.जाधव)
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत :- प्रोग्रामर,तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,पुणे यांना तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करण्याकरीता